# ORDER

Revenue and Forests Department,
Mantralaya, Mumbai 400032.
Dated 17th May, 2012

**Bombay Stamp Act 1958.**

No.MUDRANK-2007/C.R.196(4)/M-1-Whereas Government of Maharashtra, Industries, Energy & Lobour Department has extended Package Scheme of Incentives 2007 (here in after referred as the said scheme) from 1st April, 2012 upto the date of Government Resolution of New Package Scheme of Intensive vide Government Resolution, Industries, Energy & Labour Department No. PSI-17071 (CR-50)/Ind-8 dated 29 March, 2012. Now therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Bombay Stamp Act,. 1958 .(Bom. LX of 1958), the. Government of Maharashtra, hereby extends the period of exemption of Stamp Duty under the said scheme from 1st April, 20.12 upto the date of further orders in respect of New Package Scheme of Incentives and for that purpose, amends the order Revenue and Forests Department No.MUDRANK 2007/C.R.196(4)/M-1, dated 12th June, 2007 (herein after referred a s the said order) a s follows;

In the said order in paragraph one for the words, figures, and. letters "ending on the 31st March, 2012", the words, and letters "upto the date of further orders in respect of New Package Scheme of Incentives" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

( Jyotsna M. Madekar )
Desk Officer
Revenue and Forest Department

D:\MADHURI\MadekarAdhisuchana.lwp

# आदेश

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - १७ मे, २०१२

**मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८.**

क्रमांक मुद्रांक - २००७/प्र.क्र. १९६(४)/ म-१ ज्या अर्थी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्रमांक पीएसआय-१७०७(सीआर ५०)/उद्योग-८ दिनांक २९ मार्च, २०१२ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ (यापुढे त्याचा निर्देश 'उक्त योजना' असा करण्यात आला आहे) मध्ये सुधारणा करुन सदर योजनेला नवीन सामुहिक प्रोत्साहन योजने संदर्भात शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) च्या कलम ९ च्या पोट कलम (अ) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन आदेश क्रमांक: मुद्रांक-२००७/प्र.क्र.१९६(४)/ म-१ दिनांक १२/६/२००७ (यापुढे त्याचा निर्देश उक्त आदेश असा करण्यात आला आहे) अन्वये 'उक्त योजनेच्या' अंतर्गत दिलेल्या मुद्रांक शुल्काच्या सवलतीची मुदत' दिनांक १ एप्रिल, २०१२ ते नवीन सामुहिक प्रोत्साहन योजने संदर्भात शासन आदेश निर्गमित होईपर्यंतच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता' वाढवित आहे. त्याकरिता उक्त आदेशात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

उक्त आदेशात परि.१ मध्ये "३१ मार्च, २०१२ रोजी संपणा-या" या ऐवजी "नवीन सामुहिक प्रोत्साहन योजने संदर्भात शासन आदेश निर्गमित होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(जोत्स्ना मु. माडेकर)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

D:\MADHURI\MadekarAdhisuchana.lwp